ePaper
वर्ष - 9 वे | UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज ™
WWW.MAHAENEWS.COM | सोमवार, दि. 16 मार्च 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## दुबईत भीषण स्फोटांचे आवाज, हवाई दलाची मोठी कारवाई





पान 2 वरुन...

बारामतीची पोटनिवडणूक जाहीर!

### ५ राज्यांच्या निवडणुकांचे वेळापत्रक जाहीर; राहुरी, बारामतीची पोटनिवडणूकही जाहीर

# निवडणुकांचे बिगूल वाजले!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**देशात पुन्हा एकदा निवडणुकांचे बिगूल वाजले असून आसाम, केरळ, पुदुच्चेरी, तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल या राज्यांमध्ये विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आह. केंद्रीय निवडणूक आयोगाने आज पत्रकार परिषद घेऊन निवडणूक कार्यक्रम जाहीर केलाय.**



निवडणूक आयोगाचे अध्यक्ष गौतम कुमार यांनी माहिती दिली की, आसाम, केरळ, पुदुच्चेरी येथे ९ एप्रिल रोजी मतदान होईल. तर, तामिळनाडू येथे २३ एप्रिल रोजी मतदान प्रक्रिया पार पडले. तसंच, पश्चिम बंगाल दोन टप्प्यात मतदान प्रक्रिय पार पडणार असून पहिल्या टप्प्यातील मतदान २३ एप्रिल आणि दुसऱ्या टप्प्यातील मतदान प्रक्रिया २९ एप्रिल रोजी होईल. या सर्व राज्यांची मतमोजणी ४ मे रोजी होणार आहे.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार, निवडणूक आयुक्त सुखबीर सिंग संधू आणि निवडणूक आयुक्त विवेक जोशी यांचा समावेश असलेल्या निवडणूक आयोगाने दुपारी ४ वाजता पत्रकार परिषद घेतली. या निवडणुकीत ८२४ मतदारसंघांमधील २.१८ लाख मतदान केंद्रांवर १७.४ कोटी मतदार सहभागी होतील, असे सीईसीने सांगितले.



## तामिळनाडू निवडणुकीचा कार्यक्रम कसा?

३० मार्च रोजी जाहिरात प्रसिद्ध केली जाणार असून ३ एप्रिलपर्यंत उमेदवार उमेदवारी अर्ज दाखल करू शकतात. ७ एप्रिल रोजी उमेदवारांच्या अर्जांची छाननी केली जाईल. तर, ९ एप्रिल रोजी उमेदवार आपले अर्ज मागे घेऊ शकतात. तसंच, २३ एप्रिल रोजी मतदान प्रक्रिया पार पाडली जाईल, तर ४ मे रोजी मतमोजणी केली जाणार आहे.

## पश्चिम बंगालमध्ये दोन टप्प्यांत मतदान

२०२१ मध्ये पश्चिम बंगालमध्ये आठ टप्प्यांत मतदान प्रक्रिया झाली होती. मात्र, यावेळी दोनच टप्प्यांत मतदान प्रक्रिया राबवली जाणार आहे. त्यानुसार, पहिल्या टप्प्यातील मतदानासाठी ३० मार्च रोजी जाहिरात प्रसिद्ध केली जाणार असून ६ एप्रिलपर्यंत उमेदवार उमेदवारी अर्ज भरू शकतात. तर, ७ एप्रिल रोजी उमेदवारांच्या अर्जांची छानणी केली जाईल. ९ एप्रिल रोजी उमेदवार आपले अर्ज मागे घेऊ शकतात. तसंच, २३ एप्रिल रोजी पहिल्या टप्प्यातील मतदान प्रक्रिया राबवली जाणार आहे. तर, ४ मे रोजी मतमोजणी होणार आहे. दुसऱ्या टप्प्यातील मतदानासाठी २ एप्रिल रोजी जाहिरात प्रसिद्ध केली जाणार असून ९ एप्रिलपर्यंत उमेदवार अर्ज दाखल करू शकतात. १० एप्रिल रोजी अर्जांची छाननी केली जाणार असून १३ एप्रिल रोजी उमेदवार आपले अर्ज मागे घेऊ शकतात. तर, २९ एप्रिल रोजी दुसऱ्या टप्प्यातील मतदान प्रक्रिया राबवली जाणार आहे. तर, ४ मे रोजी मतमोजणी होणार आहे.

## केरळ-आसाम-पुदुच्चेरी निवडणुकीचे वेळापत्रक

१६ मार्च रोजी निवडणूक कार्यक्रमाचे जाहिरात प्रसिद्ध केली जाईल. २३ मार्चपर्यंत उमेदवार आपले अर्ज दाखल करू शकतात. २४ मार्च रोजी अर्जांची छानणी केली जाईल. २६ मार्चपर्यंत उमेदवार आपले अर्ज मागे घेऊ शकतात. ९ एप्रिल रोजी मतदान प्रक्रिया पार पडेल. तर, ४ मे रोजी मतमोजणी प्रक्रिया राबवली जाणार आहे.

## महाराष्ट्रातही पोटनिवडणूक जाहीर

केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्रातील बारामती आणि राहुरी विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीचीही घोषणा केली आहे. बारामती आणि राहुरी विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक २३ एप्रिल रोजी होणार आहे. तर ४ मे रोजी या पोटनिवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे.

# बारामतीची पोटनिवडणूक जाहीर!

## २३ एप्रिलला मतदान तर ४ मे रोजी मतमोजणी; निवडणूक आयोगाची घोषणा

**महाईन्यूज । पुणे**

**केंद्रीय निवडणूक आयोगाने आज पत्रकार परिषद घेत आसाम, केरळ, पुदुच्चेरी, तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल या राज्यांमधील विधानसभा निवडणुकीची घोषणा केली आहे. यावेळी महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील बारामती आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीचीही घोषणा करण्यात आली आहे.**




बारामती आणि राहुरी विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक २३ एप्रिल रोजी होणार आहे. तसेच ४ मे रोजी या पोटनिवडणुकीचा निकाल म्हणजेच मतमोजणी होणार आहे. ३० मार्च २०२६ रोजी या निवडणुकीची अधिसूचना जारी करण्यात येणार असल्याचं केंद्रीय निवडणूक आयोगाने स्पष्ट केलं आहे.

महाराष्ट्रातील बारामती व राहुरी या दोन मतदार संघाची पोट निवडणूक जाहीर केली आहे. महाराष्ट्राचे तत्कालिन उपमुख्यमंत्री अजित पवार याचे 28 जानेवारी रोजी अपघाती निधन झाले. त्यामुळे त्यांचा मतदारसंघ असलेल्या बारामती विधानसभेची जागा रिक्त आहे. तसचे नगर मधील राहूरी मतदारसंघाचे आमदार शिवाजीराव कार्डिले यांचे निधन झाल्याने तिही जागा रिक्त आहे.



अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी विधानसभा मतदारसंघाचे भाजपचे ६ वेळा आमदार राहिलेले दिग्गज नेते शिवाजीराव कार्डिले (वय ६७) यांचे ऑक्टोबर २०२५ मध्ये अल्पशा आजाराने निधन झाले होते. यामुळे ही जाग रिक्त झाली होती आता या जागेसाठी पोट- निवडणूक होणार आहे.

बारामती आणि राहुरी या दोन्ही जागांवर संबंधित नेत्यांच्या निधनामुळे सहानुभूतीची लाट आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात या दोन्ही पोटनिवडणुका बिनविरोध व्हाव्यात, अशी चर्चा सुरू झाली आहे. मात्र, राजकीय पक्ष काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### पोटनिवडणुकीचा कार्यक्रम कसा असेल?

- निवडणुकीसाठीची अधिसूचना : ३० मार्च २०२६
- उमेदवारी अर्ज दाखल : ६ एप्रिल २०२६
- अर्ज छाननी : ७ एप्रिल २०२६
- अर्ज मागे घेण्याची तारीख : ९ एप्रिल २०२६
- मतदान : २३ एप्रिल २०२६
- **मतमोजणी : ४ मे २०२६**

### पोटनिवडणूक बिनविरोध होणार?

बारामती आणि राहुरी पोटनिवडणुकीबाबत बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वाचं भाष्य केलं. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, "बारामती आणि राहुरी या दोन्ही पोटनिवडणुका या बिनविरोध व्हाव्यात असा आमचा प्रयत्न असेल. पण आमच्यावर जर निवडणूक लादली गेली तर आम्हीही निवडणूक लढायला तयार आहोत", असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

## पुण्यात मेट्रोचे २०० किमीचे जाळे उभारणार; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे मेट्रो प्रकल्पामुळे शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला मोठी चालना मिळाली असून पुणेकरांनी मेट्रो सेवेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. सध्या दररोज सुमारे अडीच लाख प्रवासी मेट्रोचा वापर करत आहेत. भविष्यात पुणे महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि पीएमआरडीए क्षेत्राचा समावेश असलेले जवळपास २०० किलोमीटरचे मेट्रो जाळे उभारण्याचे नियोजन असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.**



वेगाने विकसित होणाऱ्या नागरी विकासाचा विचार करून पुणे मेट्रो आणि नगर विकास विभागाने या संपूर्ण नेटवर्कचे सविस्तर नियोजन तातडीने करण्याचे निर्देश त्यांनी दिले. त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची ग्वाहीदेखील श्री. फडणवीस यांनी दिली.

पुणे शहराच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला बळकटी देणाऱ्या पुणे मेट्रो प्रकल्पाच्या प्रशासकीय मुख्यालय असलेल्या 'मेट्रो भवन'चे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पुणे मेट्रो प्रकल्पाचे काम सुरुवातीला काही अडचणींमुळे उशिरा सुरू झाले असले तरी एकदा गती मिळाल्यानंतर अत्यंत वेगाने हा प्रकल्प पूर्ण करण्यात आला. देशातील सर्वाधिक गतिमानतेने पूर्ण होणाऱ्या मेट्रो प्रकल्पांमध्ये पुणे मेट्रोचा उल्लेख केला जातो. मेट्रो स्थानकांचे आधुनिक डिझाइन, मल्टीमॉडल कनेक्टिव्हिटी, प्रवासी सुविधा तसेच अत्याधुनिक तांत्रिक प्रणाली या सर्व बाबींमध्ये उत्कृष्ट नियोजन करण्यात आले आहे.

सध्या पुणे शहरात सुमारे ३३ किलोमीटरचा मेट्रो मार्ग कार्यान्वित झाला आहे. टाटा समूहाच्या सहकार्याने देशातील पहिल्या सार्वजनिक-खाजगी भागीदारी (पीपीपी) असलेल्या २३ किलोमीटरच्या मेट्रो प्रकल्पाचे कामही अंतिम टप्प्यात असून त्यापैकी १२ किलोमीटर मार्गाचे उद्घाटन मे महिन्यात, तर उर्वरित ११ किलोमीटर मार्ग जुलै महिन्यात सुरू करण्याचे नियोजनआहे. या दोन्ही प्रकल्पांसह पुण्यातील मेट्रोचे एकूण जाळे सुमारे ५६ किलोमीटरपर्यंत पोहोचणार आहे. याशिवाय आणखी ५५ किलोमीटरचे काम सुरू असून सुमारे ८० किलोमीटरचा विस्तार प्रस्तावित आहे. भविष्यात पुणे महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि पीएमआरडीए क्षेत्राचा समावेश असलेले जवळपास २०० किलोमीटरचे मेट्रो नेटवर्क उभारण्याचे नियोजन करण्यात आले असल्याचेही त्यांनी सांगितले.

पुण्याचा वेगाने होणारा नागरी विकास लक्षात घेता या संपूर्ण २०० किलोमीटर नेटवर्कचे सविस्तर नियोजन तातडीने पूर्ण करावे, सर्व मार्गांचे डीपीआर एकत्रितपणे तयार करावेत तसेच भविष्यातील ग्रोथ सेंटर्स, नवीन विमानतळ, औद्योगिक क्षेत्रे आणि वाढती उपनगरे यांचा विचार करून मेट्रोचे जाळे विकसित करावे, अशा सूचना त्यांनी महामेट्रो प्रशासनाला दिल्या. पुढील काळात जमिनीवर, आकाशात आणि भुयारी मार्गांद्वारे वाहतूक व्यवस्था विकसित करून पुणे शहर वाहतूक कोंडीरहित आणि शाश्वत शहर बनविण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले.

### मेट्रो भवन, पुणे – ठळक वैशिष्ट्ये

- एकूण क्षेत्रफळ सुमारे ८,१५० चौ. मीटर.
- भव्य स्वागत कक्ष व पुण्याच्या सांस्कृतिक वारशाचे दर्शन घडविणारी कला स्थापना.
- अनुभव केंद्रात पुणे मेट्रोचे जाळे व प्रकल्पाची मॉडेल्स.
- ३१२ आसनक्षमतेचे सभागृह व बॅकअप संचालन नियंत्रण केंद्र, सिग्नलिंग व दूरसंचार सुविधा.
- काच दर्शनी भागामुळे नैसर्गिक प्रकाश, ऊर्जा कार्यक्षम व पर्यावरणपूरक रचना.

# ‘धुळमुक्त पिंपरी चिंचवड’ साठी पुढे या!

## नागरिकांनी अभियानात सक्रिय सहभाग नोंदवावा; महापौर रवि लांडगे यांचे आवाहन

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड शहर धुळमुक्त करण्यासाठी महापालिका विविध उपाययोजना राबवत आहे. मात्र, या उपक्रमाला यश मिळवण्यासाठी नागरिक, गृहनिर्माण सोसायट्या, व्यावसायिक आस्थापना तसेच बांधकाम व्यावसायिक यांनीही आपली जबाबदारी स्वीकारून प्रशासनाला सहकार्य करणे आवश्यक आहे. प्रत्येकाने आपल्या परिसरातील स्वच्छतेकडे जागरूकतेने लक्ष दिल्यास पिंपरी चिंचवड शहर अधिक स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी बनू शकते. ‘धुळमुक्त पिंपरी चिंचवड शहर’ या अभियानात नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवून ही मोहीम लोकचळवळ बनवावी, असे आवाहन महापौर रवि लांडगे यांनी केले.**

पुनावळे येथील ७ प्लमेरिया ड्राईव्ह सोसायटी येथे आयोजित धुळमुक्त शहर अभियान जनजागृती बैठकीत उपस्थित नागरिकांना मार्गदर्शन करतांना महापौर रवि लांडगे बोलत होते.

या बैठकीस उप महापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, नगर सदस्या रेश्मा भुजबळ, नगर सदस्य कुणाल वाव्हळकर, सामाजिक कार्यकर्ते नामदेवराव जाधव, संत तुकाराम महाराज साखर कारखान्याचे संचालक चेतन भुजबळ, शलाखा बोडांवार, गजानन सूर्यवंशी, गणेश पायाळ यांच्यासह महापालिकेचे सह शहर अभियंता सुनिल भागवानी, कार्यकारी अभियंते सोहन निकम, योगेश आल्हाट, सहाय्यक आरोग्य अधिकारी श्रीराम गायकवाड, शांताराम माने यांच्यासह सोसायटी चेअरमन गणेश भामे, सामाजिक संघटना प्रतिनिधी आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महापौर रवि लांडगे म्हणाले की, पिंपरी चिंचवड शहर वेगाने विकसित होत आहे. विकासकामांमुळे काही ठिकाणी धुळीची समस्या निर्माण होत असली तरी प्रशासन योग्य नियोजन व उपाययोजनांच्या माध्यमातून ती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न करीत आहे. शहर स्वच्छ आणि धुळमुक्त ठेवण्यासाठी केवळ महापालिका प्रशासनाचे प्रयत्न पुरेसे नसून नागरिकांनीही त्यात सक्रिय सहभाग नोंदवणे आवश्यक आहे. स्वच्छतेबाबत जागरूकता वाढवून आणि परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी सहकार्य करून नागरिकांनी या अभियानाला लोकचळवळीचे स्वरूप द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.




### स्वच्छ शहरासाठी नागरिकांनी पुढे यावे : उपमहापौर

यावेळी बोलताना उपमहापौर शर्मिला बाबर यांनीही शहर स्वच्छता आणि पर्यावरण संरक्षणासाठी नागरिकांनी पुढाकार घेण्याची गरज व्यक्त केली. शहरातील विविध सामाजिक संघटनांनी महापालिकेच्या उपक्रमांना सहकार्य करून धुळमुक्त शहराच्या उद्दिष्टपूर्तीसाठी एकत्रितपणे काम करण्याची तयारी दर्शवली.

बैठकीत मांडण्यात आलेल्या सूचनांच्या आधारे धुळमुक्त पिंपरी चिंचवड अभियान अधिक प्रभावीपणे राबविण्याबाबत महापालिका प्रशासनाकडून पुढील नियोजन करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. शहरातील पर्यावरणीय संतुलन राखण्यासाठी तसेच नागरिकांचे आरोग्य जपण्यासाठी धुळमुक्त शहर ही काळाची गरज असून यासाठी प्रशासन आणि नागरिकांनी संयुक्तपणे प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

बैठकीदरम्यान शहरातील विविध सामाजिक संघटना, नागरिक प्रतिनिधी तसेच स्थानिक पदाधिकाऱ्यांनी धुळमुक्त शहरासाठी विविध सूचना मांडल्या. शहरातील रस्त्यांवर नियमित पाणी फवारणी करणे, बांधकाम स्थळांवर योग्य त्या उपाययोजना करणे, रस्ते स्वच्छता मोहीम अधिक प्रभावीपणे राबविणे, तसेच नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करणे यासारख्या मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. नागरिकांच्या सूचनांची दखल घेत महापौर रवि लांडगे यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना तातडीने आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

महापौर रवि लांडगे यांनी शहरातील वाढते बांधकाम, वाहतूक व विकासकामांमुळे निर्माण होणाऱ्या धुळीच्या समस्येबाबत प्रशासन विविध उपाययोजना करत असल्याची माहिती दिली. शहरातील प्रमुख रस्त्यांवर यांत्रिक पद्धतीने साफसफाई, पाण्याची फवारणी, बांधकाम स्थळांवर संरक्षक जाळी लावणे, मलबा व्यवस्थापन तसेच सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतेबाबत कठोर नियमांची अंमलबजावणी करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. नागरिकांच्या सहकार्याने पिंपरी चिंचवड शहर स्वच्छ, सुंदर आणि धुळमुक्त करण्यासाठी महापालिका कटिबद्ध असल्याचे देखील महापौर रवि लांडगे यांनी सांगितले.

कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्ते नामदेवराव जाधव यांनी ‘धुळमुक्त पिंपरी चिंचवड शहर’ अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली.

लोकचळवळ जागवा - पर्यावरण वाचवा” या पर्यावरण विषयक पथनाट्याचे प्रभावी सादरीकरण पृथ्वीराज शिंदे व त्यांच्या टीमकडून करण्यात आले.

---

# यशराज अमराळे व गौरव वाघेरे यांची 'महाराष्ट्र केसरी' साठी निवड

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड कुस्तीगीर संघ व संदिपभाऊ वाघेरे युवा मंच यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्र केसरी निवड कुस्ती चाचणी स्पर्धेत पै. गौरव वाघेरे (माती विभाग) आणि पै. यशराज अमराळे (गादी विभाग) यांनी विजय मिळवत महाराष्ट्र केसरी स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली.**

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या मान्यतेने ६८ वे महाराष्ट्र राज्य अधिवेशन, राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा व महाराष्ट्र केसरी किताब लढत वाघोली (पुणे) येथे १८ ते २२ मार्च २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी पिंपरी चिंचवड शहर कुस्तीगीर संघाची निवड चाचणी स्पर्धा पार पडली.

गादी विभागातील ८६ ते १२५ किलो महाराष्ट्र केसरी गटात चऱ्होलीच्या पै. यशराज अमराळे व आकुर्डीच्या पै. तन्मय काळभोर यांच्यात चुरशीची लढत झाली. या लढतीत अमराळे यांनी गुणांच्या जोरावर विजय मिळवत महाराष्ट्र केसरी किताब लढतीसाठी प्रवेश मिळवला.



तर माती विभागातील ८६ ते १२५ किलो गटात पिंपरीचे पै. गौरव वाघेरे व भोसरीचे पै. समाधान दगडे यांच्यात रंगतदार लढत झाली. या लढतीत वाघेरे यांनी अधिक गुण मिळवत विजय संपादन केला आणि महाराष्ट्र केसरी किताब लढतीत प्रवेश निश्चित केला.

या निवड स्पर्धेत वरिष्ठ गटाबरोबरच बालगट व कुमार गटातील निमंत्रित कुस्ती स्पर्धाही घेण्यात आली. या स्पर्धेत एकूण १९१ खेळाडूंनी सहभाग घेतला असून १८६ लढती पार पडल्या.

स्पर्धेचे उद्घाटन पिंपरी चिंचवड कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष हनुमंत गावडे व नगरसेवक संदिपभाऊ वाघेरे यांच्या हस्ते झाले. यावेळी संघाचे कार्याध्यक्ष विशाल कलाटे, ज्ञानेश्वर कुटे, सचिव संतोष माचुत्रे, भारत केसरी पैलवान विजय गावडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

स्पर्धेचे पंच म्हणून विजय कुटे, रोहिदास आमले, बाळासाहेब काळजे, चंद्रकांत मोहोळ, रूपेश जाधव, निलेश मारणे, तुषार गोळे, अमित म्हस्के व पप्पू कालेकर यांनी काम पाहिले. तर कुस्ती निवेदन हंगेश्वर धायगुडे यांनी केले.



## भूमिका

**अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यात भडकलेल्या युद्धामुळे संपूर्ण जगात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. जागतिक अर्थव्यवस्थेचे 'रक्त' मानले जाणारे कच्चे तेल या संघर्षामुळे महाग झाले असून त्याचा पुरवठाही विस्कळीत झाला आहे. होर्मुझ सामुद्रधुनीतील अडथळ्यांमुळे अनेक देशांमध्ये पेट्रोल-डिझेलच्या किमती वाढल्या आहेत.**

# युद्ध थांबण्याची शक्यता?



वाहतूक खर्च वाढल्याने इतर वस्तूंच्या दरांवरही दबाव निर्माण होत आहे. जीवनावश्यक वस्तूंच्या पुरवठा साखळ्यांवर परिणाम होत असल्याने जागतिक अर्थव्यवस्था मंदीच्या दिशेने जाईल, अशी भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे हे युद्ध लवकर थांबावे, अशी अपेक्षा जगभरातून व्यक्त होत आहे.

मात्र या संघर्षाचे स्वरूप आता केवळ लष्करी न राहता प्रतिष्ठेच्या लढाईत बदलत चालले आहे. अमेरिका आणि इराण या दोन्ही देशांसाठी माघार घेणे म्हणजे राजकीयदृष्ट्या कमकुवतपणाचे लक्षण मानले जाऊ शकते. त्यामुळे 'आधी कोण मागे हटणार' हा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा बनला आहे. रशिया-युक्रेन युद्धाची स्थितीही याच कारणामुळे दीर्घकाळ टिकून आहे. युद्धाचा विस्तार जितका वाढेल, तितका त्याचा परिणाम केवळ संबंधित देशांपुरता मर्यादित न राहता संपूर्ण जगावर होणार आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवर हल्ला करण्यासारखे फारसे काही उरलेले नसल्याचे सांगत हे युद्ध लवकरच थांबेल, असे संकेत दिले आहेत. मात्र त्याच वेळी इराणकडून शेजारील सुन्नी राष्ट्रांवर क्षेपणास्त्र व ड्रोन हल्ले सुरू असल्याचे दिसते. या देशांनी थेट युद्धात भाग घेतलेला नसतानाही त्यांच्यावर हल्ले होत असल्याने मध्यपूर्वेत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे संघर्षाचा व्याप वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

युद्धविरामासाठी इराणने काही अटी मांडल्याची माहिती आहे. इराणच्या 'वैध अधिकारांचे' संरक्षण, युद्धामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई आणि भविष्यात अशा हल्ल्यांची पुनरावृत्ती होणार नाही याची हमी, या तीन प्रमुख अटी आहेत. मात्र या अटींचे नेमके स्वरूप स्पष्ट नसल्याने त्यावर सहमती होणे कठीण वाटते. दुसरीकडे, इराणनेही काही निरपराध देशांचे नुकसान केले असल्याने त्यांची भरपाई कोण करणार, हा प्रश्नही निर्माण होतो.

दरम्यान, या संघर्षामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाच्या किमतीत मोठी चढ-उतार सुरू आहे. ब्रेंट क्रूडचे दर ९० डॉलर्सवर आले असतानाच पुन्हा १०० डॉलर्सच्या आसपास पोहोचले आहेत. ही अनिश्चितता जागतिक अर्थव्यवस्थेसाठी धोकादायक आहे. कारण आज प्रत्येक देशाची अर्थव्यवस्था एकमेकांशी घट्ट जोडलेली आहे. त्यामुळे एखाद्या प्रदेशातील युद्धाचा परिणाम दूरच्या देशांनाही भोगावा लागतो. हा प्रकार जणू 'पॅसिव्ह स्मोकिंग'सारखा आहे.

या पार्श्वभूमीवर युद्धात थेट सहभागी नसलेल्या देशांनीही पुढाकार घेऊन शांततेसाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. तेल आणि गॅस पुरवठ्यासाठी पर्यायी मार्ग आणि नवीन पुरवठा साखळ्या उभारण्याची गरजही अधोरेखित झाली आहे. भारताने याबाबत दूरदृष्टी दाखवत अनेक देशांशी ऊर्जा पुरवठ्याचे करार केले आहेत. तसेच रणनीतिक तेलसाठ्याची क्षमता वाढवून संभाव्य संकटासाठी तयारी ठेवली आहे.

तथापि, दीर्घकाळ युद्ध सुरू राहिल्यास त्याचा परिणाम भारतासह सर्व देशांवर होणार हे निश्चित आहे. त्यामुळे जागतिक स्थैर्यासाठी आणि आर्थिक सुरक्षिततेसाठी हे युद्ध शक्य तितक्या लवकर थांबणे गरजेचे आहे. संघर्षातील सर्व पक्षांनी व्यापक परिणामांचा विचार करून संयम आणि संवादाचा मार्ग स्वीकारणे, हाच या संकटातून बाहेर पडण्याचा खरा उपाय ठरू शकतो.

## प्रासंगिक »

### निरीक्षण

***वैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापकांनी एक दिवस विद्यार्थ्यांची सूक्ष्म निरीक्षण शक्ती आणि किळस सोसण्याची क्षमता पाहण्यासाठी एक प्रयोग केला.***

विद्यार्थ्यांना म्हणाले, "या काचेच्या वाटीत घाणेरडे पाणी आहे. मी वाटीत बोट बुडवून तोंडात घालणार आहे. प्रत्येकाने पाहून तसेच करायचे. तिटकारा दर्शवायचा नाही. सरांनी वाटीत बोट बुडवून चाखले. पाठोपाठ एका मागून एक विद्यार्थ्यांनी ते गढूळ पाणी काहीशा अनिश्चेनेच चाखले. प्राध्यापक म्हणाले, "किळस न मानण्याच्या गुणात तुम्ही सगळेच पास झालात, पण सूक्ष्मनिरीक्षणाच्या गुणात सगळेच फसलात." 'मी करतो तसे तुम्ही करायचे होते. तुमच्या कुणाच्याच लक्षात आले नाही, मी एक बोट वाटीत बुडवले व चाखले दुसरेच.' विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचे फसविले गेल्याचे भाव पाहून प्राध्यापकांनी वाटीतले सर्व पाणी पिऊन टाकले. म्हणाले , 'या पाण्यात अपायकारक काहीच नाही !' आता विद्यार्थी खुष झाले.

तात्पर्य- प्रयोगातून अप्रिय सत्य बाहेर आले तरी ते मनोमन पटते व त्यातूनच यशाचा मार्ग खुला होतो.

राज्यात अल्पसंख्याक दर्जा देण्याच्या प्रक्रियेवरून पुन्हा एकदा गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. सरकारवर अल्पसंख्याकांचे लांगूलचालन केल्याचा आरोप अलीकडच्या काळात फारसा होत नसला, तरी शिक्षण संस्थांना अल्पसंख्याक दर्जा देताना प्रशासनाने दाखवलेली सैल भूमिका चिंताजनक ठरते.

# 'अल्पसंख्याक' आबादानी!

विशेषतः या दर्जामुळे शिक्षण हक्क कायद्यापासून (आरटीई) सूट मिळते आणि शिक्षक भरतीत सरकारी हस्तक्षेप टाळता येतो, ही बाब लक्षात घेतल्यास त्याचे परिणाम अधिक गंभीर दिसतात. या चर्चेला सुरुवात झाली ती अल्पसंख्याक दर्जासंदर्भातील एका आदेशामुळे. संबंधित खात्याचे मंत्री असताना मंजूर झालेल्या फाइलचे आदेश त्यांच्या निधनानंतर जाहीर झाले आणि त्यावरून वाद निर्माण झाला. सरकारने तत्काळ स्थगिती देत चौकशीचे संकेत दिले. मात्र या घटनेमुळे अल्पसंख्याक दर्जा देण्याची संपूर्ण व्यवस्था किती सैल झाली आहे, हे समोर आले.

१९९२ च्या कायद्यानुसार मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, पारसी आणि जैन धर्मीयांनी स्थापन केलेल्या शिक्षण संस्थांना अल्पसंख्याक दर्जा मिळतो. महाराष्ट्रात यासोबत भाषिक अल्पसंख्याकांचीही श्रेणी जोडण्यात आली आहे. सुरुवातीला या व्यवस्थेचा उद्देश अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात



आणणे हा होता. मात्र कालांतराने काही शिक्षणसंस्था चालवणाऱ्यांनी त्यातील पळवाटा शोधल्या. नियमांनुसार संस्थेच्या कार्यकारिणीत किमान ५० टक्के सदस्य अल्पसंख्याक असावेत आणि विद्यार्थ्यांपैकी ५० टक्के विद्यार्थी अल्पसंख्याक असावेत, अशी अट होती. मात्र नंतर राज्यस्तरावर विद्यार्थ्यांची अट शिथिल करण्यात आली. परिणामी, संस्थेच्या व्यवस्थापनात अल्पसंख्याक सदस्य दाखवून सहजपणे हा दर्जा मिळवण्याचे प्रकार वाढले. त्यानंतर अल्पसंख्याक दर्जासाठी शेकडो प्रस्ताव येऊ लागले आणि मोठ्या प्रमाणात ते मंजूरही झाले.

२००९ पासून आजपर्यंत राज्यात सुमारे सहा हजार शिक्षण संस्थांना हा दर्जा मिळाल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे, अलीकडील काळात मिळालेल्या दर्जांमध्ये मुस्लीम किंवा ख्रिश्चन संस्थांपेक्षा इतर भाषिक अल्पसंख्याकांच्या संस्थांचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे या धोरणाचा मूळ उद्देश बाजूला पडल्याचे दिसते.

अल्पसंख्याक दर्जामुळे संस्थांना अनेक सवलती मिळतात. आरटीई कायद्यापासून सूट, शिक्षक भरतीत स्वायत्तता आणि विविध अनुदानांचा लाभ या सुविधा त्यांना उपलब्ध होतात. त्यामुळे काही ठिकाणी हा दर्जा शिक्षणाच्या विकासापेक्षा आर्थिक फायद्यासाठी वापरला जात असल्याचे आरोप होत आहेत. मुळात अल्पसंख्याक धोरणाचा हेतू सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागे असलेल्या घटकांना संधी देणे हा होता. मात्र त्याच धोरणाचा वापर करून काही शिक्षणसम्राटांनी स्वतःची आबादानी साधल्याची टीका वाढत आहे. त्यामुळे या प्रक्रियेत पारदर्शकता आणणे आणि गैरवापराला आळा घालणे, ही सरकारपुढील खरी कसोटी ठरणार आहे.

## || अभंगवाणी ||



न बोलेसी करा वाचा ।  
उपाधीचा संबंध ॥१॥

एका तुमच्या नामाविण ।  
अवघा सीण कळतसे ॥ध्रु.॥

\- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# लोटे एमआयडीसीत 'थर्स ऑरगॅनिक'मध्ये स्फोट

## प्रायोगिक प्रक्रियेदरम्यान तापमान अचानक वाढल्याने ड्रमला पेट

**महाईन्यूज** । दापोली

**खेड तालुक्यातील लोटे परशुराम औद्योगिक वसाहतीतील 'थर्स ऑरगॅनिक' या रासायनिक कारखान्यात सकाळी १० वाजण्याच्या सुमारास रसायनाच्या ड्रमचा स्फोट झाला. कारखाना व्यवस्थापनाने तात्काळ आगीवर नियंत्रण मिळविल्याने मोठा अनर्थ टळला. या धावपळीत एका कामगाराचा पाय मुरगळून तो किरकोळ जखमी झाला.**



लोटे एमआयडीसीतील डॉ. खान कंपनीतील स्फोटाची घटना अजूनही ताजी असतानाच 'थर्स ऑरगॅनिक' या रासायनिक कारखान्यात घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात काही काळ चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. अचानक झालेल्या स्फोटाच्या आवाजामुळे परिसरातील नागरिकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरणही पसरले होते. मिळालेल्या माहितीनुसार, कारखान्यात नवीन उत्पादनासाठी प्रायोगिक तत्त्वावर ड्रममध्ये विविध रसायनांचे मिश्रण करण्याची प्रक्रिया सुरू होती. ही प्रक्रिया प्रयोगाच्या स्वरूपात सुरू असल्याने संबंधित विभागातील कामगार आणि तांत्रिक कर्मचारी त्या ठिकाणी उपस्थित होते.

मात्र या प्रक्रियेदरम्यान आवश्यक ती खबरदारी न घेतल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. ड्रममधील रसायनांचे मिश्रण करत असताना त्याचे तापमान अचानक वाढले. तापमान वाढल्यामुळे रासायनिक प्रतिक्रिया वेगाने होऊन त्या रसायनाने पेट घेतला. त्यामुळे संबंधित ड्रमचा मोठ्या आवाजात स्फोट झाला. स्फोटाचा आवाज इतका मोठा होता की त्याचा आवाज नजीकच्या अग्निशमन दलापर्यंतही पोहोचला. यानंतर अग्निशमन अधिकारी नलावडे यांनी तत्काळ जवानांसह अग्निशमन बंब घेऊन घटनास्थळी धाव घेतली.

मात्र तोपर्यंत कारखाना व्यवस्थापनाने तातडीने उपाययोजना करत आगीवर नियंत्रण मिळविले होते. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली. या गोंधळाच्या परिस्थितीत कामगारांमध्ये काही काळ धावपळ उडाली. याच धावपळीत एका कामगाराचा धावताना पाय मुरगळल्याने तो किरकोळ जखमी झाला. कारखाना व्यवस्थापनाने तत्काळ त्याला खाजगी वाहनाने उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल केले. सध्या त्याची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळाली आहे.

दरम्यान, या घटनेनंतर नजीकच्या चाळकेवाडी गावातील ग्रामस्थांनी कारखान्याला भेट देऊन संपूर्ण प्रकाराची माहिती घेतली. यावेळी ग्रामस्थांनी कारखाना व्यवस्थापनाशी चर्चा करत तीव्र नाराजी व्यक्त केली. कारखान्यात प्रयोग किंवा उत्पादन प्रक्रिया करताना आवश्यक असलेल्या सर्व सुरक्षा उपाययोजना काटेकोरपणे राबवाव्यात, तसेच परिसरात मानवी वस्ती असल्याचे भान ठेवून कामकाज करावे, अशी स्पष्ट सूचना ग्रामस्थांनी कारखाना व्यवस्थापनाला दिली. भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी अधिक दक्षता घेण्याची मागणीही त्यांनी केली.

# कुडाळ येथे ज्येष्ठ नागरिकांच्या विरंगुळा केंद्राला अखेर सुरुवात

**महाईन्यूज** । कुडाळ

**ज्येष्ठ नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचे व गरजेचे असलेले कुडाळ येथील विरंगुळा केंद्र अनेक वर्षांपासून विविध तांत्रिक अडचणींमुळे रखडलेले होते मात्र अनेक वर्षांच्या प्रतिक्षेनंतर ज्येष्ठ नागरिक संघाच्या विरंगुळा केंद्राच्या इमारतीच्या कामाला अखेर प्रत्यक्षात सुरुवात करण्यात आली. महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री नामदार शिवेंद्रराजे भोसले यांच्या प्रयत्नातून हे काम मार्गी लागले असून इमारतीवरील स्लॅब भरण्याच्या कामाचा शुभारंभ ज्येष्ठ नागरिक आणि ग्रामस्त यांच्या उपस्थितीत पार पडला.**



कुडाळसह पंचक्रोशीतील ज्येष्ठ नागरिकांसाठी हे विरंगुळा केंद्र एक महत्त्वाचे ठिकाण ठरणार आहे. आयुष्यभर कष्ट करून समाज घडवणाऱ्या ज्येष्ठांना निवांत वेळ घालवण्यासाठी, संवाद साधण्यासाठी आणि विविध उपक्रमांसाठी एक स्वतंत्र जागा उपलब्ध होणार असल्याने परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असलेल्या या इमारतीचे काम सुरू झाल्यामुळे ज्येष्ठ नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद स्पष्टपणे दिसत होता या इमारतीचे काम काही वर्षांपासून लालफितीच्या अडचणींमध्ये अडकले होते. अनेकदा प्रयत्न करूनही प्रत्यक्ष काम सुरू होत नव्हते. मात्र बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या माध्यमातून या कामाला गती मिळाली आणि अखेर प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात झाली.

या कामासाठी माजी सरपंच वीरेंद्र शिंदे तसेच ज्येष्ठ नागरिक संघाच्या सदस्यांनी सातत्याने पाठपुरावा केला असल्याचे संघाचे अध्यक्ष भाऊराव शेवते यांनी सांगितले.त्यांच्या प्रयत्नांमुळे आणि लोकप्रतिनिधींच्या सहकार्यामुळे आज हा ऐतिहासिक क्षण आला असल्याचेही शेवते यांनी सांगितले. या विरंगुळा केंद्राचे बांधकाम पूर्ण होऊन कुडाळ आणि पंचक्रोशीतील ज्येष्ठ नागरिकांसाठी एक सुसज्ज आणि आत्मीयतेने भरलेले केंद्र उभे राहणार आहे. अनेक वर्षांपासूनची प्रतीक्षा संपून आज प्रत्यक्ष काम सुरू झाल्यामुळे हा दिवस कुडाळच्या इतिहासात ज्येष्ठ नागरिकांसाठी आनंदाचा आणि भावनिक ठरेल असे मत माजी सरपंच विरेंद्र शिंदे यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले.

यावेळी विरंगुळा केंद्राच्या पायाभरणीच्या आठवणींनाही आज उजाळा मिळाला. ज्येष्ठ नागरिक संघाचे आधारस्तंभ म्हणून ओळखले जाणारे स्वर्गीय मनोज वंजारी यांच्या योगदानामुळेच या केंद्राची संकल्पना पुढे आली होती, असे संघाचे उपाध्यक्ष भिकू राक्षे यांनी सांगितले. माजी सरपंच विरेंद्र शिंदे यांनी उपस्थितांचे स्वागत केले तर महेश पवार यांनी सर्वांचे आभार मानले.

यावेळी भाऊराव शेवते, चंद्रसेन शिंदे, माजी सरपंच विरेंद्र शिंदे, उपसरपंच सोमनाथ कदम, अजिजभाई मुजावर, भिकू राक्षे, विलास कांबळे, आशिष रासकर, ज्ञानेश्वर कुंभार, उत्तम देवकर, जयसिंगराव शिंदे, ननावरे बापू, अरुण किरवे, महेश पवार, अजित शिराळकर, हनुमंतराव शिंदे, बाळकृष्ण राक्षे, बाळासाहेब वारागडे, देवराम चौधरी, नथू दादा कदम, रावसो कुंभार, सुदाम रासकर, दत्तात्रय शिंदे यांच्यासह मान्यवर आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# होर्मुझच्या नाकेबंदीमुळे अमेरिकेची कोंडी?

## चीनकडे मदत मागितल्यामुळे इराणने उडवली डोनाल्ड ट्रम्प यांची खिल्ली

**महाईन्यूज । तेहरान**

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शनिवारी 'होर्मुझच्या सामुद्धुनी'तून (STRAIT OF HORMUZ) होणारी व्यापारी जहाजांची वाहतूक सुरक्षित करण्यासाठी इतर राष्ट्रांना मदतीचे आवाहन केले. मात्र, इराणने या विनंतीची खिल्ली उडवली आहे.**





इराणचे परराष्ट्र मंत्री सय्यद अब्बास अराघची यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'X' वर पोस्ट करत म्हटले की, अमेरिकेचे सुरक्षा कवच "छिद्रांनी भरलेले" (कुचकामी) आहे. त्यांनी असा दावाही केला की, होर्मुझ सुरक्षित ठेवण्यासाठी अमेरिका आता चीनसारख्या देशांकडे "याचना" करत आहे. इराणसोबत सुरू असलेल्या वाढत्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, जगातील सर्वात महत्त्वाच्या ऊर्जा मार्गांपैकी एक असलेला हा भाग आता वादाचा केंद्रबिंदू ठरत आहे.

"अमेरिकेचे तथाकथित सुरक्षा कवच कुचकामी ठरले असून ते संकटांना रोखण्याऐवजी निमंत्रण देत आहे. अमेरिका आता होर्मुझ सुरक्षित करण्यासाठी इतरांकडे, अगदी चीनकडेही मदत मागत आहे. इराण आपल्या शेजारी राष्ट्रांना आवाहन करतो की, त्यांनी विदेशी आक्रमकांना हाकलून लावावे, कारण त्यांचा एकमेव हेतू इस्रायलचे रक्षण करणे हाच आहे," असे अराघची यांनी नमूद केले.

ट्रम्प यांनी पोस्टमध्ये म्हटलं की, "अनेक देश विशेषतः इराणच्या होर्मुझची सामुद्रधुनी बंद करण्याच्या प्रयत्नामुळे प्रभावित झालेले देश, होर्मुझची सामुद्रधुनी खुली आणि सुरक्षित ठेवण्यासाठी युद्धनौका पाठवतील आणि अमेरिकेसोबत सामील होतील. आम्ही इराणची लष्करी क्षमता १०० टक्के नष्ट केली आहे. मात्र, त्यांचा कितीही पराभव झाला तरी होर्मुझच्या या जलमार्गात कुठेही एक किंवा दोन ड्रोन पाठवणं, भूसुरुंग टाकणं किंवा क्षेपणास्त्र डागणं हे इराणसाठी सोप्प आहे. त्यामुळे आम्हाला आशा आहे की चीन, फ्रान्स, जपान, दक्षिण कोरिया, ब्रिटन यांच्यासह या कृत्रिम नाकेबंदीमुळे प्रभावित झालेले इतर देशही या भागात त्यांच्या युद्धनौका पाठवतील", असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

होर्मुझची सामुद्धुनी हा एक धोरणात्मक मार्ग आहे, जिथून जगातील एकूण तेल पुरवठ्याचा साधारणपणे एक पंचमांश (१/५) भाग जातो. इराणने या मार्गावर कडक नियंत्रण ठेवले असून, अमेरिका, इस्रायल आणि त्यांच्या मित्रराष्ट्रांच्या जहाजांवर निर्बंध घालण्याचा इशारा दिला आहे. अमेरिका आणि इस्रायलच्या इराणवरील हल्ल्यांमुळे तेलाच्या वाढत्या किमती कमी करण्यासाठी वॉशिंग्टन प्रयत्नशील आहे.

# दुबईत भीषण स्फोटांचे आवाज, हवाई दलाची मोठी कारवाई

**महाईन्यूज । दुबई**

**मध्य पूर्वेतील देशांमध्ये गेल्या १६ दिवसांपासून युद्ध सुरू असून रविवारी पहाटे दुबईतील अनेक प्रमुख जिल्ह्यांत मोठे आवाज झाल्याचं येथील नागरिकांनी सांगितलं. हे आवाज प्रामुख्याने दुबई मरिना आणि अल सुफूह भागात ऐकू आले. दुबई मीडिया ऑफिसने याबाबत अधिकृत माहिती दिली असून त्यांनी म्हटलंय की, संयुक्त अरब अमिरातीच्या (UAE) अत्याधुनिक हवाई संरक्षण प्रणालीने केलेल्या यशस्वी प्रतिवादामुळे (INTERCEPTIONS) हे आवाज झाले होते.**



गेल्या दोन दिवसांतही अशाच प्रकारच्या घटनांची नोंद झाली होती. शनिवारी शहराच्या मध्यवर्ती भागात स्फोट किंवा प्रतिवादाशी संबंधित आवाज ऐकू आले, तर शुक्रवारी दुबईच्या गजबजलेल्या 'डाउनटाउन' भागातील रहिवाशांनी अशाच आवाजांची माहिती दिली. प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार, शुक्रवारी दुबईच्या आर्थिक क्षेत्रावर संशयित इराणी ड्रोनने हल्ला केला, ज्यामुळे मोठे स्फोट झाले आणि आकाशात धुराचे लोट उसळले. हा हल्ला अमिरातीचे महत्त्वाचे व्यापारी केंद्र असलेल्या 'दुबई इंटरनॅशनल फायनान्शिअल सेंटर'ला लक्ष्य करून करण्यात आला होता. एएफपी (AFP) प्रतिनिधीने दिलेल्या माहितीनुसार, शहरात दोन मोठे स्फोट झाले, ज्यांच्या तीव्रतेमुळे आसपासच्या इमारती हादरल्या. त्यानंतर काही वेळातच मध्यवर्ती भागातून काळ्या धुराचे लोट उठताना दिसले.

दरम्यान, रविवारी झालेल्या इराणी हल्ल्यांनंतर युएईच्या फुजैराह तेल टर्मिनलवरील कामकाज ठप्प झाले. फुजैराहमध्ये धुराचे लोट हवेत पसरले होते आणि अधिकारी अनेक तास आग विझवण्याचा प्रयत्न करत होते. या हल्ल्यात एक जॉर्डनचा नागरिक जखमी झाला असून, बंदरातील तेल भरण्याचे काही काम तात्पुरते थांबवण्यात आले आहे. ओमानच्या आखातात असलेले फुजैराह बंदर 'हॉर्मुझची सामुद्रधुनी'च्या बाहेर असल्याने युएई आणि जागतिक तेल बाजारासाठी ते अत्यंत महत्त्वाचे केंद्र आहे. या बंदरामुळे तेल निर्यात करताना जगातील सर्वात संवेदनशील सागरी मार्गांपैकी एक असलेल्या अरुंद सामुद्रधुनीला वळसा घालणे शक्य होते.

### दुबईवर इराणी हल्ल्यांचे संकट

जागतिक आर्थिक आणि विमान वाहतुकीचे प्रमुख केंद्र असलेले दुबई शहर इराणसोबतच्या युद्धात थेट हल्ल्यांचा सामना करत आहे. अमिरातीच्या अधिकाऱ्यांनुसार, युद्ध सुरू झाल्यापासून आतापर्यंत युएईच्या दिशेने १,७०० हून अधिक क्षेपणास्त्रे आणि ड्रोन डागण्यात आले आहेत, ज्यापैकी बहुतांश हवाई संरक्षण यंत्रणेने यशस्वीरीत्या रोखले आहेत. असे असूनही, काही हल्ले किंवा पडलेल्या ढिगाऱ्यांमुळे दाट लोकवस्ती असलेल्या या शहरातील घरे, कार्यालये आणि रस्त्यांचे नुकसान झाले असून यात चार नागरिकांचा मृत्यू झाला आहे, तर डझनभर लोक जखमी झाले आहेत. २८ फेब्रुवारी रोजी अमेरिका आणि इस्रायलच्या संयुक्त लष्करी हल्ल्यात इराणचे ८६ वर्षीय सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी मारले गेल्यापासून पश्चिम आशियात मोठा तणाव निर्माण झाला आहे.

# क्रिती खरबंदाची रोमँटिक पोस्ट व्हायरल



अभिनेत्री क्रिती खरबंदा हिने "शादी में जरूर आना" या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये दमदार एन्ट्री केली. या चित्रपटातील तिच्या अभिनयाला प्रेक्षकांकडून मोठा प्रतिसाद मिळाला आणि तिची लोकप्रियता झपाट्याने वाढली. त्यानंतर क्रिती विविध कारणांमुळे नेहमीच चर्चेत राहिली. तिच्या अभिनयासोबतच तिच्या स्टाइल, फॅशन आणि वैयक्तिक आयुष्याबद्दलही चाहत्यांमध्ये नेहमीच उत्सुकता असते. मात्र अलीकडच्या काळात ती चित्रपटसृष्टीत आणि सोशल मीडियावर तुलनेने कमी सक्रिय असल्याचे पाहायला मिळते. त्यामुळे तिच्या प्रत्येक नव्या पोस्टकडे चाहत्यांचे विशेष लक्ष असते.दरम्यान, क्रितीने अलीकडेच तिच्या अधिकृत इंस्टाग्राम अकाउंटवर एक खास पोस्ट शेअर केली आहे. पती पुलकित सम्राटसोबतच्या वैवाहिक आयुष्यातील दोन वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने तिने १० खास फोटो चाहत्यांसोबत शेअर केले आहेत. या फोटोंमध्ये त्यांच्या आयुष्यातील अनेक सुंदर आणि खास क्षण टिपलेले दिसतात. काही फोटो प्रवासातील, काही खास सेलिब्रेशनचे तर काही अगदी साध्या पण भावनिक क्षणांचे आहेत. प्रत्येक फोटोसोबत क्रितीने एक आकर्षक आणि भावनिक कॅप्शन लिहिले असून त्यातून तिच्या भावना स्पष्टपणे व्यक्त झाल्या आहेत. या पोस्टमधून तिने पती पुलकितबद्दलचे प्रेम, आपुलकी आणि त्यांच्यासोबतच्या आठवणी अतिशय सुंदर शब्दांत मांडल्या आहेत.पोस्टच्या शेवटी क्रितीने लिहिले, "आम्हाला दोघांनाही दोन वर्षांच्या शुभेच्छा." तिच्या या पोस्टवर चाहत्यांनी आणि अनेक सेलिब्रिटी मित्रांनीही शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. अनेकांनी या जोडीला "परफेक्ट कपल" म्हणत त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# दंगल फेम अभिनेत्रीचे स्वप्न साकार!



प्रत्येक कलाकाराचं आपलं मुंबईत हक्काचं घर असावं असं स्वप्न असतं. अनेक जण आपल्या मेहनतीने आणि परिश्रमानं हे स्वप्न साकार करतात. दंगल गर्ल सान्या मल्होत्रा या अभिनेत्रीने हे स्वप्न पूर्ण केले आहे. तिने मुंबईत आपल्या हक्काचे घर विकत घेतले आहे. वयाच्या अवघ्या 34 व्या वर्षी तिने मुंबईत घर खरेदी केले आहे.नवीन घराची पहिली झलक तिने चाहत्यांसाठी सोशल मीडियावरुन शेअर केली आहे. नवीन घराच्या फोटोंसोबत तिने खास नोट शेअर केली आहे. चाहत्यांनी तिचे अभिनंदन केले आहे. या आलिशान घराची किंमत 14.3 कोटी रुपये असल्याचे सांगितले जात आहे. बॉलिवूडच्या दंगल चित्रपटातून सान्याने एन्ट्री केली. तिने बबीता फोगाटची भूमिका साकारली होती. नंतर तिने अनेक चित्रपटांमधून अभिनय कौशल्य दाखवत प्रेक्षकांची कौतुकाची थाप मिळवली.अनेक वर्षांच्या मेहनतीनंतर सान्याने मुंबईत खर खरेदीचे स्वप्न साकार झाल्याचा आनंद पोस्टमधून व्यक्त केला आहे. ती म्हणाली," हर हर महादेव ,कित्येक वर्षांची स्वप्नं, मेहनत, शिकणं आणि स्वतःला घडवण्याचा प्रवास...या घराची प्रत्येक भिंत मला नेहमी आठवण करून देईल की संयम आणि विश्वास याचं फळ किती सुंदर असू शकतं. या संपूर्ण प्रवासात माझ्या कुटुंबाचा आणि मित्रांचा विश्वास हीच माझी सर्वात मोठी ताकद होती. हे फक्त एक घर नाही...हा माझ्या प्रवासाचा एक छोटासा, पण खूप खास भाग आहे. माझ्या घरी तुमचं स्वागत.सान्या मल्होत्राच्या या पोस्टवर अनेक चाहत्यांनी तसेच तिच्या सहकलाकार आणि अनेक सेलिब्रेटींनी शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. हे नवीन घर अतिशय प्रशस्त असून तिच्या घरातून समुद्राचं सुंदर दृश्य दिसतं.

# केडी द डेव्हिल हा आगामी चित्रपट लवकरच रिलीज



केडी: द डेव्हिल हा आगामी ॲक्शन-ड्रामा-थ्रिलर चित्रपट लवकरच रिलीज होणार आहे. आहे. या कन्नड भाषिक चित्रपटात बॉलिवूड अभिनेता संजय दत्त आणि अभिनेत्री शिल्पा शेट्टी यांच्या महत्वाच्या भूमिका आहेत.चित्रपटाचे पोस्टर आणि गाणी समोर येत असून, एक नवीन पार्टी साँग समोर आले आहे. या गाण्यात नोरा फतेही आयटम नंबर करताना दिसत असून, संजय दत्तने तिला साथ दिली आहे."सरके चुनर तेरी सरके" असे या गाण्याचे बोल आहेत. यात नोरा फतेही आणि संजय दत यांचा अफलातून परफॉर्मन्स बघायला मिळत आहे. नोरा तिच्या एनर्जेटिक डान्सिंग स्टाइलमुळे चर्चेत असते. या गाण्यातील तिच्या मूव्हूज लक्ष वेधून घेत आहेत. हे पार्टी साँग चाहत्यांना खूप आवडले आहे. केव्हीएन प्रॉडक्शनच्या यूट्यूब चॅनलवर रिलीज झालेल्या या गाण्यात संजय दत्त त्याच्या अनोख्या शैलीत नाचताना दिसत आहे. बेंगळुरूमधील एएमबी सिनेमाजमध्ये झालेल्या एका कार्यक्रमात हे गाणे लाँच करण्यात आले. नुकताच पार पडलेल्या झी सेने अॅवार्ड २०२६ मध्ये नोराने अक्षय कुमार आणि वरुन धवन या स्टार्ससोबत स्टेज शेअर केला होता. यावेळी उपस्थित असणाऱ्या चाहत्यांची मनं तिने परफॉर्मन्सद्वारे जिंकली होती."केडी" द डेव्हिल हा चित्रपट 30 एप्रिल रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात संजय दत्त आणि शिल्पा शेट्टी यांच्यासोबत रेश्मा नानैया, व्ही. रविचंद्रन, रमेश अरविंद आणि नोरा फतेहीही भूमिका आहेत. प्रेम एस. यांनी केडीचे दिग्दर्शन केले आहे. हिंदी, कन्नड, तमिळ, तेलुगू आणि मल्याळम भाषेत हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाची कथा 70 च्या अंडरवर्ल्डवर आधारित असल्याची चर्चा आहे.



# 44 व्या वर्षी अनुष्का शेट्टी विवाहबंधनात अडणार?

साऊथ चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री अनुष्का शेट्टी लवकरच लग्नबंधनात अडकणार असल्याची जोरदार चर्चा रंगली आहे. बाहुबली चित्रपटातून अनुष्काला मोठी प्रसिद्धी मिळाली होती. देवसेना हे पात्र तिने साकारले होते. तिच्या भूमिकेचे प्रेक्षकांनी भरभरून कौतुक केले होते.आता तिचे नाव एका बिझनेसमनसोबत जोडले जात असून, ती लवकरच विवाहबंधनात अडणार असल्याचे बोलले जात आहे. मात्र, ती नेमकं कोणासोबत लग्न करणार याची अधिकृत माहिती समोर आलेली नाही.मिळालेल्या माहितीनुसार, अभिनेत्री आता नव्या आयुष्याची सुरुवात करण्याच्या तयारीत आहे.

# दक्षिण आफ्रिकेने काढला वचपा!

## न्यूझीलंडचा ९१ धावांत खुर्दा, ७ विकेट्सनी मिळवला विजय

**महाईन्यूज । दक्षिण आफ्रिका**

**टी२० वर्ल्डकप स्पर्धेच्या सेमी फायनलच्या लढतीत न्यूझीलंडने दक्षिण आफ्रिकेचा धुव्वा उडवत दिमाखात फायनल गाठली होती. जिव्हारी लागणाऱ्या या पराभवाचा वचपा दक्षिण आफ्रिकेने अवघ्या आठवडाभरात घेतला आहे. माऊंट मांघनाई इथे झालेल्या लढतीत दक्षिण आफ्रिकेने न्यूझीलंडचा डाव ९१ धावांतच गुंडाळला. हे छोटेखानी लक्ष्य ३ विकेट्सच्या मोबदल्यात गाठत आफ्रिकेने बाजी मारली.**




दोन्ही संघांनी प्रमुख खेळाडूंना या मालिकेसाठी विश्रांती देण्याचा निर्णय घेतला आहे. न्यूझीलंडचा कर्णधार मिचेल सँटनर मालिकेतील पाचपैकी तीनच सामने खेळणार आहे. रविवारी झालेल्या लढतीत सँटनरने टॉस जिंकून बॅटिंगचा निर्णय घेतला. खेळपट्टी बॉलिंगसाठी पोषक आहे याचा अंदाज त्याला आला नाही. डेव्हॉन कॉनवे आणि टॉम लॅथम हे अनुभवी खेळाडू झटपट तंबूत परतले. टीम रॉबिन्सन, निक केली मोठी खेळी साकारू शकले नाहीत. टी२० विशेषज्ञ बेव्हॉन जेकब्ज १० धावा करून तंबूत परतला. कर्णधार सँटनरने १५ तर अनुभवी जेमी नीशामने २६ धावांची खेळी केली. वर्ल्डकपमध्ये खेळलेल्या कोली मॅककोन्हीने १५ धावा करत प्रतिकार केला. न्यूझीलंडचा डाव ९१ धावांतच गडगडला. आफ्रिकेतर्फे पदार्पणवीर नकोबनी मोकेनाने ३ तर गेराल्ड कुत्सिया, ओटनील बार्टमन आणि केशव महाराज यांनी प्रत्येकी २ विकेट्स पटकावल्या.

छोट्या लक्ष्याचा पाठलाग करताना आफ्रिकेची सुरुवातही डळमळीत झाली. दुखापतीतून सावरत पुनरागमन करणारा टोनी द झोरी २ धावा करून तंबूत परतला. रुबीन हरमनही झटपट माघारी परतला. कॉनर इस्टरह्यूझनने नाबाद ४५ धावांची खेळी करत संघाच्या विजयाचा पाया रचला. जेसन स्मिथने १० तर डिआन फोरेस्टरने १६ धावा करत कॉनरला चांगली साथ दिली. या विजयासह दक्षिण आफ्रिकेने पाच सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.

टी२० वर्ल्डकप स्पर्धेत दक्षिण आफ्रिकेचा संघ दमदार फॉर्मात होता. सेमी फायनलच्या लढतीत त्यांच्यासमोर न्यूझीलंडचं आव्हान होतं. प्राथमिक फेरीत त्यांनी न्यूझीलंडवर विजय मिळवला होता. मात्र इडन गार्डन्स, कोलकाता इथे झालेल्या सेमी फायनलच्या लढतीत दक्षिण आफ्रिकेला धक्कादायक पराभवाला सामोरं जावं लागलं. दक्षिण आफ्रिकेने प्रथम फलंदाजी करताना १८९ धावांची मजल मारली. मात्र फिन ॲलनच्या ३३ चेंडूत शतकाच्या बळावर न्यूझीलंडने आफ्रिकेचा धुव्वा उडवला होता. या पराभवाचा वचपा काढण्याची संधी दक्षिण आफ्रिकेकडे होती. ती त्यांनी या रविवारी साधली.

## भारतीय महिला हॉकी संघ उपविजेता; अंतिम फेरीत इंग्लंडकडून पराभव

**महाईन्यूज । हैदराबाद**

**वेगवान आणि आक्रमक सुरुवात केल्यानंतरही भारतीय महिला हॉकी संघाचा इंग्लंडच्या अचूक नियोजनबद्ध खेळापुढे निभाव लागला नाही. त्यामुळे विश्वचषक पात्रता हॉकी स्पर्धेत भारताला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. शनिवारी झालेल्या अंतिम लढतीत इंग्लंडने भारतीय संघाचा २-० असा पराभव केला. मात्र, भारतीय महिला संघाने या वर्षी होणाऱ्या विश्वचषक हॉकी स्पर्धेसाठी पात्रता आधीच सिद्ध केली होती.**



जागतिक क्रमवारीत सहाव्या स्थानावर असलेल्या इंग्लंडच्या महिला हॉकी संघाने अंतिम सामन्यात प्रभावी कामगिरी करत भारतीय महिला संघाचा २-० असा पराभव केला आणि स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. सामन्याच्या सुरुवातीपासूनच दोन्ही संघांमध्ये चुरशीची लढत पाहायला मिळाली. मात्र, इंग्लंडच्या संघाने महत्त्वाच्या क्षणी संधी साधत आघाडी मिळवली आणि ती अखेरपर्यंत कायम ठेवण्यात यश मिळवले.

सामन्याच्या १३व्या मिनिटाला इंग्लंडच्या ग्रेस बाल्सडन हिने मिळालेल्या पेनल्टी कॉर्नरचा अचूक फायदा घेत गोल करत संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. या गोलनंतर इंग्लंडचा आत्मविश्वास अधिकच वाढला. भारतीय संघाने त्यानंतर जोरदार प्रयत्न करत गोलची बरोबरी साधण्याचा प्रयत्न केला, मात्र इंग्लंडच्या भक्कम बचावफळीमुळे भारतीय आक्रमणाला यश मिळू शकले नाही.

दुसऱ्या हाफमध्ये इंग्लंडने पुन्हा एकदा आक्रमक खेळ दाखवला. सामन्याच्या ४३व्या मिनिटाला एलिझाबेथ नील हिने शानदार मैदानी गोल करत इंग्लंडची आघाडी २-० अशी दुप्पट केली. या गोलमुळे भारतीय संघावर अधिक दबाव आला. भारतीय महिला संघाने शेवटपर्यंत जोरदार झुंज देत गोल करण्याचा प्रयत्न केला, परंतु इंग्लंडच्या बचावफळीसमोर त्यांचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले.

सामन्याच्या सुरुवातीच्या दहा मिनिटांत भारतीय खेळाडूंनी इंग्लंडवर चांगला दबाव निर्माण केला होता. मिडफिल्डमध्ये चांगली चेंडूवर पकड ठेवत भारतीय संघाने काही संधी निर्माण केल्या, मात्र निर्णायक क्षणी फिनिशिंगचा अभाव जाणवला. इंग्लंडच्या गोलरक्षकानेही उत्कृष्ट बचाव करत भारताच्या गोल करण्याच्या संधी हाणून पाडल्या.

या स्पर्धेतून इंग्लंडसह भारत आणि स्कॉटलंड या तीन संघांनी आगामी महिला हॉकी विश्वचषक स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे. तिसऱ्या स्थानासाठी झालेल्या सामन्यात स्कॉटलंडने इटलीचा १-० असा पराभव करत तिसरे स्थान पटकावले.

दरम्यान, या स्पर्धेच्या कामगिरीमुळे भारतीय महिला संघानेही आपली क्षमता दाखवून दिली आहे. अंतिम सामन्यात पराभव पत्करावा लागला असला, तरी संपूर्ण स्पर्धेत भारतीय संघाने सातत्यपूर्ण कामगिरी करत उपविजेतेपद पटकावले. आगामी विश्वचषक स्पर्धेत भारतीय महिला संघ अधिक दमदार कामगिरी करण्यासाठी सज्ज असल्याचे संकेत या स्पर्धेतून मिळाले आहेत. यंदाची महिला हॉकी विश्वचषक स्पर्धा १४ ते ३० ऑगस्ट या कालावधीत होणार असून त्यामध्ये जगातील अव्वल संघांमध्ये चुरशीच्या लढती पाहायला मिळणार आहेत. या स्पर्धेत भारत, इंग्लंड आणि स्कॉटलंड यांसारखे संघ दमदार कामगिरीसाठी मैदानात उतरणार आहेत.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। सोमवार ।
दि. 16 मार्च 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती




# काँग्रेस विरोधात शहरात भाजपचे 'रणशिंग'

## लोकशाहीच्या मंदिराचे पिकनिक स्पॉटमध्ये रूपांतर करणाऱ्या राहुल गांधींचा निषेध

**महाईन्यूज । पिंपरी चिंचवड**

**संसदेच्या चालू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी आणि इतर खासदारांनी संसदेच्या 'मकर प्रवेशद्वारा'चा वापर 'पिकनिक स्पॉट'प्रमाणे केल्याचा गंभीर आरोप करत आज पिंपरी- चिंचवड भाजपच्या वतीने आक्रमक निदर्शने करण्यात आली. शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात कार्यकर्त्यांनी काँग्रेसविरोधात जोरदार घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला.**

या आंदोलनात यावेळी शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापु) काटे, संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, सरचिटणीस वैशाली खाड्ये, प्रदेश दक्षिण भारतीय आघाडी अध्यक्ष राजेश पिल्ले, वरिष्ठ उपाध्यक्ष संजय पटनी, माजी महापौर नितीनआप्पा काळजे, नगरसेवक सचिन तापकीर, शितल उर्फ विजय शिंदे, मंदार देशपांडे, अमित गावडे, नगरसेविका आरती चोंधे, मनीषा पवार, स्नेहा कलाटे, महिला मोर्चा अध्यक्षा सुजाता पालांडे, युवा मोर्चा अध्यक्ष दिनेश यादव, विशाल वाळुंजकर, देवदत्त लांडे, सचिन राऊत, विभीषण चौधरी, सतपाल गोयल, भूषण जोशी, धरम वाघमारे, संतोष तापकीर, नरेश खुळे, गोरख कुंभार, दिलीप गडदे, खंडू देव कठोरे, मनोजराव ब्राह्मणकर, दिनेश काटे पाटील इत्यादी मान्यवर व भाजपचे आजी-माजी नगरसेवक, विविध आघाड्यांचे प्रमुख, मंडल प्रमुख आणि शहर कार्यकारणी पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते.

### नेमका वाद काय?

दिल्लीत सध्या संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू आहे. या अधिवेशनादरम्यान काँग्रेसच्या खासदारांनी संसदेच्या मुख्य 'मकर प्रवेशद्वारा' जवळ एकत्र येऊन तिथे 'पार्लमेंट पिकनिक स्पॉट' तयार करण्याचा प्रयत्न केला. लोकसभा अध्यक्षांच्या स्पष्ट निर्देशांनुसार,संसद परिसरातील कोणत्याही प्रवेशद्वाराजवळ धरणे-आंदोलन किंवा निदर्शने करण्यास मनाई आहे. या नियमांचे उल्लंघन करून काँग्रेसने संसदेच्या शिष्टाचाराची पायमल्ली केल्याचा दावा भाजपने केला आहे.

### मोरवाडीत भाजपचे शक्तिप्रदर्शन

रविवारी सकाळी ११ वाजता मोरवाडी येथील भारतीय जनता पार्टीच्या मध्यवर्ती कार्यालयासमोर हे आंदोलन झाले. यावेळी बोलताना शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे म्हणाले की, "संसद हे लोकशाहीचे मंदिर आहे. मात्र, राहुल गांधी आणि त्यांचे सहकारी या पवित्र जागेचा वापर वैयक्तिक प्रसिद्धी आणि पिकनिकसाठी करत आहेत. हा केवळ नियमभंग नसून देशाच्या सर्वोच्च सभागृहाचा अवमान आहे."



### आंदोलनाची प्रमुख वैशिष्ट्ये

- प्रशासकीय शिस्त: लोकसभा अध्यक्षांच्या अधिकारांचा अवमान केल्याचा मुद्दा भाजपने प्रकर्षाने मांडला.
- काँग्रेसवर टीकास्त्र: लोकशाहीच्या गप्पा मारणारी काँग्रेसच नियमांचे उल्लंघन केला आहे .

# एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, आळंदी यांच्या वतीने ठाकरवाडी येथे जनजागृती कार्यक्रम संपन्न

## उन्नत भारत अभियान अंतर्गत ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी डिजिटल साक्षरतेचा उपक्रम

**महाईन्यूज ।** आळंदी

**ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी डिजिटल साक्षरतेचा उपक्रम; ठाकरवाडी येथे जनजागृती कार्यक्रम संपन्न आळंदी : एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, आळंदी यांच्या वतीने उन्नत भारत अभियान अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ठाकरवाडी (च्होली खुर्द) येथे इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी डिजिटल साक्षरता जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला.**






या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांना संगणक व मोबाईलचा मूलभूत वापर, इंटरनेटचा सुरक्षित वापर तसेच शिक्षणामध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचे महत्त्व याबाबत माहिती देण्यात आली. प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना डिजिटल साधनांचा वापर समजावून सांगण्यात आला. विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात उत्साहाने सहभाग घेतला. महाविद्यालयाचे संचालक डॉ. बी. बी. वाफरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. तसेच उपसंचालक डॉ. मानसी अतितकर व डॉ. अक्षदा कुलकर्णी यांचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमासाठी उन्नत भारत अभियान समन्वयक डॉ. श्रीराम कर्गावकर, फॅकल्टी समन्वयक श्री. हनुमंत मावकर व डॉ. ऋतुजा देशपांडे यांचे मार्गदर्शन लाभले. या उपक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थी स्वयंसेवक प्रसाद ठीकेकर, वैष्णवी कांबळे, सायली मडणे, गणेश गुंथाळ, गिरीश चव्हाण, आकाश भाड व गौरव माने यांनी सक्रिय सहभाग घेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शाळेचे मुख्याध्यापक श्री. राजेश कांबळे यांनी महाविद्यालयाचे व सर्व स्वयंसेवकांचे आभार मानले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल साक्षरतेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी असे उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरत असल्याचे त्यांनी सांगितले.

# ‘ती’ने आत्मविश्वासाने जीवनाचे संतुलन साधावे; पद्माताई भोसले

**महाईन्यूज ।** पिंपरी चिंचवड

**‘ती’ ने फक्त घरातील जबाबदाऱ्यांपुरतं मर्यादित न राहता स्वतःच्या करिअर आणि वैयक्तिक आकांक्षा शोधून पुढे यावे. ‘ती’ ने आत्मविश्वास आणि दृढ निश्चयाने व्यावसायिक आणि कौटुंबिक जीवन दोन्हीचे संतुलन साधावे. तसेच इतरांचे अनुकरण करण्यापेक्षा ‘स्व’ ची ओळख स्वीकारली तर जीवनात आनंद मिळेल. सर्व क्षेत्रात आता महिला महत्त्वाच्या भूमिका बजावत आहेत. आंतरराष्ट्रीय महिला दिन हा महिला सक्षमीकरणाचा उत्सव आणि विविध क्षेत्रातील त्यांच्या कामगिरीची ओळख आहे असे पीसीइटीच्या उपाध्यक्षा पद्माताई भोसले यांनी सांगितले.**




पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीइटी) पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालय (पीसीसीओइ) येथे महाविद्यालय अंतर्गत तक्रार समिती यांच्या सहकार्याने महिला दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात पद्माताई भोसले बोलत होत्या.

यावेळी मॅनेजमेंट इन्फॉर्मेशन सिस्टीम प्रमुख डॉ. एस. शिंदे, शैक्षणिक प्रमुख डॉ. के. राजेश्वरी, इनोव्हेशन इंक्युबेशन प्रमुख डॉ. रजनी पीके, फॅकल्टी डेव्हलपमेंट अँड वेल्फेअर डॉ. एस. भंडारी, इंटरनॅशनल रिलेशन्स प्रमुख डॉ. रोशनी राऊत, क्वालिटी ऍशुरन्स डॉ. व्ही. हरपाळे, उपयोजित विज्ञान प्रमुख डॉ. लीना शर्मा, संगणक अभियांत्रिकी प्रमुख डॉ. सोनाली पाटील, माहिती तंत्रज्ञान विभाग डॉ. जयश्री कट्टी, सीएसइ प्रमुख डॉ. अनुराधा ठाकरे, संगणक अभियांत्रिकी प्रमुख डॉ. रचना पाटील, बहुविद्याशाखीय अभ्यास विभाग प्रमुख डॉ. संजीवनी सोनार, कॉम्प्युटर एप्लीकेशन प्रमुख डॉ. अश्विनी लाडेकर आदी उपस्थित होते.शिक्षणामुळे महिलांना स्वतःची खरी ओळख आणि क्षमता समजून घेण्याची संधी मिळते. तसेच आत्मविश्वास निर्माण होऊन स्वतंत्र निर्णय घेण्याची प्रेरणा मिळते आणि भविष्यासाठी योग्य, अयोग्य निवड करण्याचे धैर्य प्राप्त होते असेही पद्माताई भोसले म्हणाल्या.

पीसीसीओइ ने हे शैक्षणिक वर्ष “एआय वर्ष” म्हणून घोषित केले आहे. यावेळी महिला सक्षमीकरणासाठी एआय या विषयावर आधारित प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थिनींनी महिलांच्या सुरक्षितता, आरोग्य, शिक्षण, आर्थिक साक्षरता, करियर संबंधित समस्या यावर एआय आधारित उपाय सादर केले होते. पीसीसीओइच्या विद्यार्थ्यांनी ऑस्ट्रेलियातील लाट्रोब विद्यापीठाच्या सहकार्याने विकसित केलेल्या “निर्भया” प्रकल्प सादर केला होता. तसेच प्राध्यापक, विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण केले.

प्रास्ताविक आयसीसी प्रभारी डॉ. वृषाली भालेराव यांनी तर सूत्रसंचालन श्रावणी भांडलकर आणि प्राजक्ता चव्हाण या विद्यार्थिनींनी केले. प्रा. डॉ. सोनल गोरे यांनी आभार मानले.

पीसीइटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई आणि पीसीसीओइचे संचालक, प्राचार्य डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी सर्वांना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.


PRIYADARSHANI SCHOOL & JR COLLEGE
MOSHI
43 YEARS OF
NURTURING VALUES,
EXCELLENCE AND
TOMORROW'S LEADERS.
ADMISSIONS OPEN FOR AY 2026-27
Grade Nursery to Grade V
WHY CHOOSE PRIYADARSHANI SCHOOL?
43 Years of Excellence in Education | Advanced Robotics & Computer Labs
Experienced and Dedicated Faculty | Multiple Sports Grounds for All-Round Development
Proven 100% Results in Grade X | A Perfect Blend of Tradition and Innovation
+91 9890613333 | +91 9373073077
pgosm05@gmail.com
www.priyadarshanischoolmoshi.in


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046